**<u>नियमित दिवाणी दावा क्र.३४०/२०१३ मधील अर्ज नि.क्र.११२ वरील आदेश</u>**
**(श्री. भालचंद्र गोपाळ साठ्ये वि. सौ. नुतन आनंदा कदम)**

**CNR-MHSN06001713-2013**

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी त्यांच्या विरुध्द झालेला उलटतपास नाही असा आदेश रद्द होवून प्रतिवादीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादी यांच्या अर्जामधील कथन असे की, वादी वकील हे सदर दिवशी दुस–या न्यायालयात कामात व्यस्त असल्याने प्रतिवादीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास घेणेस विलंब झाला होता. म्हणुन त्यांच्या विरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत झालेला आहे. सबब त्यांनी त्यांच्या विरुध्द झालेला उलटतपास नाही असा आदेश रद्द होवुन प्रतिवादीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास घेणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावरच त्यांचे म्हणणे देऊन अर्जातील कथने ही खोटी असल्याचे कथन करुन योग्य तो आदेश पारीत करावे अशी विनंती केली आहे.

४. वादीने अर्जामध्ये ते इतर न्यायालयात व्यस्त असल्याने त्यांना प्रतिवादीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास घेण्याकरीता विलंब झाल्याने त्यांच्या विरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत केल्याचे कथन केले आहे. वादीने अर्जात केलेली कथने ही संयुक्तिक वाटत नाहीत. तरी देखील वादीस प्रतिवादीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास घेण्याकरीता संधी देणे न्यायोचित होणार आहे. परंतु वादीच्या गैरहजेरीमुळे प्रतिवादीची जी गैरसोय झालेली आहे, त्याबद्दल प्रतिवादीस रक्कम रुपये २००/– नुकसान भरपाई देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करणे मला न्यायोचित वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज रक्कम रु.२००/– (अक्षरी रु. दोनशे मात्र) वादीने प्रतिवादीस खर्च म्हणून देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. वादी यांच्या विरुध्द झालेला उलटतपास नाही असा आदेश रद्द करण्यात येतो व त्यांना साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात येते.

**सही/–**

मिरज. **(स्वाती भा. नाईकनवरे–गरड)**

दि. १९/०१/२०२३ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज

C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | S. K. Jadhav, Grade-3 |
| Court. | : | Jt. Civil Judge,Jr.Dn.,Miraj |
| Date. | : | 19/01/2023. |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 19/01/2023. |
| Order uploaded on. | : | 20/01/2023. |